२५ वर्षे विश्वासार्हतेची

follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd. No. 72105/99 ❖ वर्ष २६ ❖ अंक ३४३ ❖ शुक्रवार दि.१३ सप्टेंबर २०२४ ❖ पाने ४ ❖ किंमत ५/-

# धार्मिक ध्रुवीकरण थोपविण्याचे आव्हान

**अलिबाग :** श्रीवर्धन मतदारसंघ हा पूर्वी शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जायचा. मात्र सुनील तटकरे यांनी या शिवसेनेच्या बालेकिल्ल्याला सुरुंग लावला आणि राष्ट्रवादीची पकड मजबूत केली. सलग तीन वेळा तीन तटकरे मतदारसंघाचे आमदार बनले. आदिती तटकरे यांनी मतदारसंघाची बांधणी केली. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेससाठी हा मतदारसंघ सोपा असला, तरी बदलती राजकीय समीकरणे आणि बहुजन व मुस्लीम मतांचे होणारे ध्रुवीकरण थोपविण्याचे आव्हान महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरें यांच्यासमोर आहे.



श्रीवर्धन, तळा, म्हसळा, माणगाव आणि रोहा तालुक्यातील काही भाग मिळून श्रीवर्धनचा मतदारसंघ तयार होतो. पूर्वी काँग्रेस, शेकाप आणि शिवसेना हे या मतदारसंघातील प्रमुख पक्ष ओळखले जायचे. मात्र मतदारसंघ पुनर्रचनेत माणगाव मतदारसंघ रद्द झाल्याने श्रीवर्धन मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसने पहिल्यांदा दावा सांगितला. यानंतर या मतदारसंघातील काँग्रेस पक्षाला उतरती कळा लागली. शेकाप आणि शिवसेनेची ताकद क्षीण होत गेली. जिल्हा परिषद आणि राज्यातील सत्तेच्या जोरावर राष्ट्रवादी काँग्रेसने मतदारसंघावर आपली पकड घट्ट केली.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा याचीच प्रचीती आली आहे. श्रीवर्धन मतदारसंघातून महायुतीकडून निवडणूक लढविणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेच्या सुनील तटकरे यांना २९ हजारांचे मताधिक्य मिळाले. तटकरे यांना ८६ हजार ९०२ तर शिवसेना उबाठा गटाच्या अनंत गीते यांना ५७ हजार ०३० मते पडली. गीते यांना पडलेल्या मतांमध्ये मुस्लीम आणि बहुजन मतांचा मोठा वाटा होता.

श्रीवर्धनमध्ये अल्पसंख्याक समाजाची मते मोठ्या प्रमाणात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाने महायुतीत प्रवेश केल्याने मतदारसंघात मोठ्या प्रमाणात अस्वस्थता आणि नाराजी निर्माण झाली होती. सुनील तटकरे यांनी ही नाराजी दूर करण्यासाठी अल्पसंख्याकांचे मेळावे घेतले. महायुतीत असलो तरी सर्वधर्मसमभावाचा विचार सोडणार नसल्याची ग्वाही त्यांनी दिली. मात्र तरीही मतदारसंघात मतांचे धार्मिक ध्रुवीकरण बऱ्याच प्रमाणात झाल्याचे लोकसभा निवडणुकीत दिसून आले होते. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत विरोधकांपेक्षा धार्मिक ध्रुवीकरण रोखणे हेच मोठे आव्हान आहे. गेल्या निवडणुकीत शिवसेनेकडून विनोद घोसाळकर यांनी या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती, पण ते मतदारांवर फारसा प्रभाव पाडू शकले नव्हते. यावेळी शिवसेना ठाकरे गटाकडून या मतदारसंघातून दक्षिण रायगडचे जिल्हाप्रमुख अनिल नवगणे यांना उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर रायगड जिल्ह्यात शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात कुरबुरी वाढल्या आहेत. शिवसेनेच्या ताब्यात असलेल्या कर्जत विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसने युतीचा धर्म पाळला नाही, तर श्रीवर्धनमधून जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर निवडणूक लढवतील, असा थेट इशारा आमदार महेंद्र थोरवे यांनी दिला आहे.

तटकरे कुटुंबातील तीन आमदार या मतदारसंघातून सातत्याने विधानसभेवर निवडून आले आहेत. त्यामुळे गेल्या दीड दशकात श्रीवर्धन हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाऊ लागला आहे. जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे भक्कम संघटन असलेला असलेला हा जिल्ह्यातील एकमेव मतदारसंघ आहे.

# महाविकास आघाडीची १२५ जागांवर सहमती

## उर्वरित मतदारसंघाबाबत चर्चा सुरु : बाळासाहेब थोरात

**संगमनेर :** आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीची १२५ जागांवर सहमती झाली असून उर्वरित जागांवरही सर्व सहमतीने निर्णय होईल. विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला १८० पेक्षा जास्त जागा मिळतील असा विश्वास विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केला.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर ते माध्यमांच्या प्रतिनिधीशी बोलत होते. यावेळी आमदार थोरात म्हणाले की, महाविकास आघाडीच्या जागा वाटपाबाबत दोन तीन बैठका झाल्या असून १२५ जागांवर सहमती झाली आहे. उर्वरित जागांसाठी गणेशोत्सवानंतर बैठक होऊन सहमती होईल. समविचारी पक्षांना बरोबर घेऊन आम्ही निवडणूक लढवणार असून महाविकास आघाडीला अत्यंत चांगले वातावरण आहे. १८० पेक्षा जास्त जागा आम्ही मोठ्या मताधिक्याने जिंकू असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.महायुतीमध्ये सध्या फक्त मारामारी सुरू आहे. त्यांची दररोज भांडणे आपण पाहत आहोत. त्यांची आणि महाविकास आघाडीची तुलना नको असेही ते म्हणाले. महाराष्ट्रात झालेली पक्ष फूट किंवा कुटुंबातील फूट ही राज्यातील जनतेला आवडली नसून लोकसभा निवडणुकीमध्ये त्याचा प्रत्यय महायुतीला आला आहे.

## कम्युनिस्ट नेते सीताराम येचुरी यांचे निधन



**नवी दिल्ली :** मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते सीताराम येचुरी यांचे आज दुपारी एम्स रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने देशभरातील राजकीय आणि सामाजिक वर्तुळात हळहळ व्यक्त केली जात आहे.

येचुरी यांना एक्यूट रेस्पिरेटरी ट्रॅक्ट संसर्ग झाल्यामुळे १९ ऑगस्ट रोजी उपचारासाठी एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले.

येचुरी यांचा जन्म चेन्नई येथे तेलुगु भाषिक कुटुंबात झाला. त्यांचे वडील आंध्र प्रदेश परिवहन विभागात अभियंता होते तर त्यांच्या आई शासकीय अधिकारी होत्या. केंद्रीय बोर्डात दहावीच्या परीक्षेत देशात सर्वप्रथम आलेल्या येचुरी यांनी अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठात शिकत असताना त्यांनी तब्बल तीन वेळा विद्यार्थी संघाचे

# राहुल गांधी वादाच्या भोवऱ्यात

## अमेरिकेत घेतली भारतविरोधी खासदाराची भेट

**नवी दिल्ली :** आपल्या तीन दिवसाच्या अमेरिका दौऱ्यात लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी अमेरिकेतील भारतविरोधी खासदार इल्हान उमर यांची भेट घेतल्यामुळे ते वादाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. विशेषतः भारतीय जनता पक्षाकडून त्यांना टीकेचे लक्ष केले जात आहे.

अमेरिकन संसदेतील खासदार इल्हान उमर या भारत विरोधी म्हणून ओळखल्या जातात. आफ्रिकेतून अमेरिकेत शरणार्थी म्हणून आलेल्या आणि अमेरिकन संसदेत पोहोचलेल्या दोन मुस्लिम महिला खासदारांपैकी त्या एक आहेत. त्यांच्याकडून वारंवार स्वतंत्र काश्मीर आणि खलिस्तानची मागणी केली जाते. काही वर्षांपूर्वी त्यांनी पाक व्याप्त काश्मीरला भेट दिली होती. हा दौरा पाकिस्तान पुरस्कृत असल्याचे सांगितले जाते.

भारताचा विरोध करणाऱ्या, भारताच्या विरोधात अभियान चालवणाऱ्या खासदारांना भेटून राहुल गांधी यांनी राष्ट्रद्रोही पाऊल उचलले असल्याचा आरोप भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय महासचिव दुष्यंत गौतम यांनी केला आहे.

काँग्रेस आता उघडपणे देश विरोधी कृत्य करायला लागली असल्याचा आरोप करून भाजपच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी देखील राहुल गांधी यांच्यावर कठोर टीका केली.

राहुल गांधी यांच्यासाठी पाकिस्तानातून आंबे तर चीनमधून राजीव गांधी फाउंडेशनमध्ये पैसे येत असल्याचा आरोप त्यांनी केला. भारत विरोधी सर्व देश आणि इतर देशातील भारत विरोधी लोकप्रतिनिधी यांच्याशी राहुल गांधी यांचे सख्य असल्याचा आरोपही त्यांनी केला.

# एसटी बसचं रुप पालटणार

## २१५ नवीन लालपरी ताफ्यात दाखल होणार

**मुंबई** राज्य परिवहन महामंडळाच्या हजारो बसेस नादुरुस्त आहेत. या नादुरुस्त बसेसमुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. सदोष बस अनेकदा रस्त्यावर थांबते आणि प्रवासी अडकून पडतात. त्यामुळे आता एसटीच्या ताफ्यात अशोक लेलँडच्या साध्या डिझेलवर धावणाऱ्या बसेस दाखल होणार आहेत. साधारणपणे ऑक्टोबरमध्ये ५० ते १०० नवीन बस एसटीच्या ताफ्यात दाखल होणार आहेत. दिवसेंदिवस वाढणारी प्रवाशी संख्या आणि अपुऱ्या बसेस संख्येमुळे नवीन बस खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. या नवीन बसेसची संख्या साधारण २१५ असून शकते. एसटी महामंडळाच्या १५ हजार ८०० बसेस सध्या धावत आहेत. मात्र, यापैकी अनेक बस खिळखिळ्या झाल्या असून या बसमुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे एसटीने नवसाध्या डिझेल बस घेण्याचा निर्णय घेतला आहे. या नव्या बस ग्रामीण भागातील वाहतुकीसाठी फायदेशीर ठरेल, असा आशावाद व्यक्त करण्यात आला आहे. एसटी महामंडळ अशोक लेलँड कंपनीकडून दोन हजार ५०० स्वमालकीच्या डिझेलवर धावणाऱ्या स खरेदी करणार आहे. या बस गाड्यांची मूळ प्रतिकृती



तयार करण्यात आली आहे. हे विविध चाचण्यांद्वारे प्रमाणित केले गेले आहेत. तिरुचिरापल्ली (तामिळनाडू) येथील कंपनीच्या कारखान्यात १० सप्टेंबर रोजी त्याची अंतिम तपासणी केली जाईल. ऑक्टोबरमध्ये सुमारे ५० ते १०० बसेस आणि एसटीचा ताफ्यात दाखल होणार आहेत. तसेच नोव्हेंबरपासून १५० ते ३०० बसेसचा प्रवास सुरू होणार आहे. त्यामुळे प्रवाशांचा एसटी श्रेणीतून प्रवास सुरू राहणार असल्याचे एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. तसेच एसटी महामंडळाने भाडेतत्त्वावर नव्या एक हजार ३१० बस घेण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार मुंबई, पुणे, छत्रपती संभाजी नगर, नाशिक, अमरावती, नागपूर येथे नवीन एसटी भरतीसाठी निविदा भरण्यासाठी इच्छुकांना आवाहन केले आहे. एसटी महामंडळ आणि खासगी बसपुरवठादार यांच्यात सात वर्षांचा करार करण्यात येईल.

# संजयकाका पाटील हे शरद पवार यांच्या भेटीला

## सांगलीच्या राजकीय क्षेत्रात तर्कवितर्क

**सांगली :** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचे माजी खासदार संजयकाका पाटील यांनी पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतल्याने तासगावसह सांगलीच्या राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झालेली नसून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा अनावरणाचे निमंत्रण देण्यासाठी शरद पवार यांची भेट घेतल्याचा खुलासा संजयकाका पाटील यांनी केला आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच राजकीय पक्षांची मोर्चेबांधणी सुरू असून, तासगाव-कवठेमहांकाळ विधानसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार म्हणून आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील यांची उमेदवारी दोन महिन्यांपूर्वीच खा. पवार यांनी कवठेमहांकाळ येथे झालेल्या शेतकरी मेळाव्यात जाहीर केली आहे. या पार्श्वभूमीवर माजी खासदार पाटील यांनीही एका पराभवाने आपण खचून जाणार नसून, विधानसभेची निवडणूक ताकतीने लढविण्याचे संकेत तासगावमधील दहीहंडी कार्यक्रमात दिले होते. तसेच भाजपचे मतदारसंघ प्रचारप्रमुख प्रभाकर पाटील यांना साथ द्यावी, असे आवाहन करीत चिरंजीवाच्या उमेदवारीचे अप्रत्यक्ष संकेतही दिले.



या पार्श्वभूमीवर बुधवारी पाटील यांनी खा. पवार यांची निवासस्थानी जाऊन भेट घेतली. यानंतर सांगलीसह तासगाव तालुक्याच्या राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली असून, या भेटीत कोणती राजकीय खलबते पार पडली याबद्दल तर्क-वितर्क लढविले जात आहेत. या भेटीसंदर्भात माजी खासदार पाटील यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी सांगितले, ही भेट

# शिवसेनेची सोबत चालते, मग आम्हाला दूर का लोटता

## एमआयएम प्रदेशाध्यक्ष इम्तियाज जलील यांचा महाविकास आघाडीला सवाल

**मुंबई :** काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसला शिवसेनेची सोबत चालते. मग आमच्या पक्षाला दूर का लोटता, असा सवाल ऑल इंडिया मजलीस ए इत्तेहादुल मुसलमीन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी महाविकास आघाडीला केला आहे.

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीची साथ द्यायला आमची तयारी आहे. त्यासाठीचा प्रस्ताव आम्ही सादर केला असून महाविकास आघाडीकडून उत्तराची वाट बघत आहोत. अंबादास दानवे हे वेगळ्या पातळीवरील नेते आहेत. महाविकास आघाडीत एमआयएमला सहभागी करून घेणार की नाही, याचे उत्तर शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी द्यावे, अशी मागणी ही जलील यांनी केली.


एमआयएम राज्यात किती जागा लढवणार हे आघाडीच्या गणितावर ठरणार आहे. आगामी निवडणुकीत एमआयएमची ताकद वाढलेली दिसून येणार आहे. वास्तविक महाविकास आघाडी आणि महायुती या दोघांनाही जनता कंटाळली आहे. अनेक पक्षांचे मोठे नेते आपल्या संपर्कात असून त्यांच्याकडून पक्षप्रवेशाचा प्रस्ताव आल्यास आपण त्यावर निश्चितपणे विचार करू, असेही जलील यांनी सांगितले.

आम्ही आतापर्यंत पाच उमेदवार जाहीर केले आहेत. इच्छुक उमेदवारांना अर्ज देण्याचे काम सुरू झाले आहे. त्यांच्याकडून अर्ज भरून आल्यानंतर पक्षप्रमुख खासदार असदुद्दीन ओवेसी उमेदवारी बाबत निर्णय घेतील. जागांसाठी आम्ही लाचार नाही.

# आळंदीतील मद्यविक्री, वेश्याव्यवसाय बंद न झाल्यास पोलिसांवर कारवाई

**पिंपरी :** आळंदीत मद्यविक्री, वेश्याव्यवसाय यांसारखे प्रकार वाढल्याच्या तक्रारी येत असून, आळंदीत घडणारे हे प्रकार चिंताजनक आहेत. पोलिसांना आवश्यक ती सर्व मदत देण्यात येत असताना असे प्रकार रोखण्याची जबाबदारी कोणाची आहे, असा सवाल करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे प्रकार बंद न झाल्यास कारवाई करण्याचा इशारा पिंपरी-चिंचवड पोलिसांना दिला.

आळंदीतील विविध विकासकामांचे भूमिपूजन पवार यांच्या हस्ते गुरुवारी झाले. त्या वेळी ते बोलत होते. आमदार दिलीप मोहिते, तहसीलदार ज्योती देवरे,



मुख्याधिकारी कैलास केंद्रे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा निर्मला पानसरे या वेळी उपस्थित होते.

मंदिर परिसरात मद्यविक्री, वेश्या व्यवसाय सुरू असल्याची तक्रार काँग्रेस कार्यकर्त्यांनी पवार यांच्याकडे केली होती. या पार्श्वभूमीवर पवार म्हणाले की, श्री संत ज्ञानेश्वर महाराजांसमोर नतमस्तक झाल्याशिवाय आपण पुढे जात नाही. पण, माउलींच्या आळंदीत घडणारे प्रकार चिंताजनक आहेत. पोलिसांना हवे ते दिले जात आहे. पुण्यात सात, तर पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी चार पोलीस ठाणे मंजूर केले आहेत. त्यामुळे असे व्यवसाय बंद करण्याची जबाबदारी कोणाची आहे? इथे असणाऱ्या अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी. हे व्यवसाय बंद झाले नाहीत, तर पोलिसांवर कारवाई केली जाईल.

समाजामध्ये तेढ, दुही निर्माण होते. त्यांच्याविरोधात कायदेशीर कारवाई केली जाणे शक्य असेल ती केली जाईल, असेही पवार यांनी स्पष्ट केले.

# मोदी यांची गणेशोत्सवाच्या निमित्ताने सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या निवासस्थानी भेट

**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गणेशोत्सवाच्या निमित्ताने सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या निवासस्थानी दिलेली भेट आणि शिवसेना पक्ष आणि चिन्ह याबाबत दाखल याचिकेच्या सुनावणीला होणारा विलंब, याची सांगड घालत शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी खुद्द सरन्यायाधीशांवरच शंका व्यक्त केली आहे. शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणी खरोखरच न्याय मिळणार का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सरन्यायाधीशांच्या दिल्ली येथील निवासस्थानी जाऊन गणेशोत्सवानिमित्त गौरी आणि गणेशाचे दर्शन घेतले.



भारतासारख्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रात पंतप्रधानांनी धार्मिक कार्यक्रमासाठी सरन्यायाधीशांच्या निवासस्थानी जाणे हे संविधान आणि राजशिष्टाचाराला धरून आहे काय, असा सवालही राऊत यांनी केला.

शिवसेना पक्ष आणि चिन्ह याबाबत आम्ही न्यायालयीन लढाई लढत आहोत. मात्र, त्यासाठी तारखांवर तारखा पडत आहेत. त्यामुळे या प्करणी आम्हाला न्याय मिळणार का, अशी शंका वाटू लागली आहे. सरन्यायाधीश पदावर चंद्रचूड यांच्यासारखी व्यक्ती असतानाही न्याय मिळण्यास विलंब का होत आहे? खुद्द सरन्यायाधीशांनी महाराष्ट्रातील महायुती सरकारला घटनाबाह्य सरकार म्हटले आहे. मग प्रत्यक्ष निर्णय होण्यास एवढा कालावधी का लागतो? पंतप्रधानांची सरन्यायाधीशांच्या निवासस्थानी भेट आणि त्यांच्यातील राजकीय जवळीक पाहता यामागे काही वेगळी कारणे आहेत का, अशी शंका घेण्यास वाव आहे, असेही राऊत म्हणाले.

महाराष्ट्रातील बेकायदेशीर सरकार वाचवण्यासाठी महाराष्ट्राचा अभिमान असलेल्या शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांना खतम करायचे. त्यासाठी न्यायालयांची मदत घ्यायची, असा सत्ताधाऱ्यांचा डाव असल्याच्या शंका अधोरेखित झाल्या आहेत, असेही ते म्हणाले.

१२/०९, १:२१/ि डहीशश:

बर्लिन: वृत्तसंस्था

भारतात यूपीआय पेमेंट चा वापर करून लोक रस्त्यावर कांदे बटाटे आणि छोट्या मोठ्या दुकानात किराणामालही खरेदी करतात. ही बाब अचंबित करणारी आहे. जर्मनी या क्षेत्रात फार मोठा आवाका गाठू शकेल, अशी शक्यता वाटत नव्हती. मात्र, भारतापासून प्रेरणा घेऊनच जर्मनीने या क्षेत्रात मोठी मजल मारली आहे, असे प्रतिपादन जर्मनीच्या परराष्ट्रमंत्री ॲनालेना बेअरबॉक यांनी केले.

## स्थित्यंतर

राही भिडे



# बेरोजगारीचे कटू वास्तव

**गणेशोत्सवाचे दिवस सुरू आहेत, ढोलताशांसह सजावटीचे, पूजेचे साहित्य खरेदी करण्यासाठी सर्वांचीच लगबग अजूनही सुरू आहे. त्या करिता बाजारपेठा फुलून गेल्या असून, सुमारे सव्वा लाख कोटींची उलाढाल होत आहे. असे सांगितले जात असले तरी अर्थव्यवस्थेला मात्र नुकताच ब्रेक लागला आहे. भांडवली बाजाराचा फुगा कधीही फुटू शकतो, असे केंद्र सरकारच्या अर्थसल्लागारांनीच सांगितले आहे.**

देशात बेरोजगारीचा दर कमी झाल्याचे सांगितले जाते परंतु वस्तुस्थिती निराळीच आहे. उच्च शिक्षित लोक उंदीर पकडण्याच्या किंवा सफाई कामगारांच्या जागांसाठी अर्ज करीत असतील, तर परिस्थिती किती भयावह आहे, हे लक्षात येते. लोकसभेच्या निवडणुकीत बेरोजगारी, महागाई या मुद्यांची चर्चा होऊ नये, म्हणून भावनिक मुद्दे पुढे आणले. आता जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभेच्या निवडणुकांचा प्रचार सुरू असताना बेरोजगारीच्या मुद्याने डोके वर काढले आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. 'हरियाणा स्किल एम्प्लॉयमेंट कॉर्पोरेशन' (एचकेआरएन) ने पाच हजार स्वच्छता कामगारांच्या पदांसाठी भरती काढली आहे. प्रत्यक्षात पाच हजार पदांसाठी आतापर्यंत एक लाख २० हजार अर्ज आले आहेत. आश्चर्याची बाब म्हणजे या अर्जांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर पदवीधरांचाही समावेश आहे. ३९,९९० पदवीधर आणि ६,११२ पदव्युत्तरांनी स्वच्छता कामगारांच्या नोकरीसाठी अर्ज केले आहेत. बारावीपर्यंत शिकलेले १,१७,१४४ अर्जदार आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे स्वतः च्या जिल्ह्यातच नियुक्ती दिली जाणार आहे. या पदांसाठी वयोमर्यादा १८-४२ वर्षे आणि ८ वी उत्तीर्ण पात्रता आहे. मुंबई महापालिकेने देखील उंदीर पकडण्यासाठी कंत्राटी पद्धतीने नोकर भरतीसाठी अर्ज मागवले होते. तेव्हाही पदवीधर, द्विपदवीधरांनी अर्ज केले होते. सातवी पास, बारावी पास अशा पात्रतेच्या पदांसाठी उच्च शिक्षितांना अर्ज करण्याची वेळ येत असेल, तर कुठेतरी चुकते आहे, हे मान्य करायला हवे. माहिती तंत्रज्ञान कंपन्यांनी भरती बंद केली आहे. स्टार्टअप बंद पडत आहेत. उद्योगधंदे बंद पडत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात लोक बेरोजगार होत आहेत. ताज्या आकडेवारीनुसार, या वर्षी जानेवारीपासून विविध कंपन्यांनी एकूण १.५३ लाख लोकांना कामावरून काढले आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये २७ हजारांहून अधिक नोकर कपातीची घोषणा करण्यात आली आहे. इंटेल, आयबीएम आणि सिस्को या प्रमुख कंपन्यांनी टाळेबंदी सुरू केली आहे. २०२४ मध्ये आतापर्यंत ४२२ हून अधिक कंपन्यांनी एक लाख ३२ हजारांपेक्षा जास्त कामगारांना कामावरून काढून टाकण्यात आले आहे. दररोज २,७०० लोकांच्या नोकऱ्या जात आहेत.

आर्थिक मंदीच्या भीतीनंतर २०२३ मध्ये जगभरातील अनेक मोठ्या कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्यास सुरुवात केली आहे. जानेवारीच्या सुरुवातीपासून, अनेक टेक कंपन्या, युनिकॉर्न आणि स्टार्टअप्सनी त्यांच्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले आहे. ज्यांनी टाळेबंदीतून सुटका केली आहे, त्यांना पगार कपात किंवा पगारात वाढ न झाल्याने अडचणी येत आहेत. रशिया-युक्रेन युद्धामुळे निर्माण झालेली अस्थिरता, वाढती महागाई आणि जागतिक आव्हाने यामुळे सध्या अनिश्चिततेचे वातावरण आहे. इंटेलने आर्थिक आव्हानांमध्ये १५ हजार नोकर कपातीची घोषणा केली आहे. सिस्को सिस्टीम सहा हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकणार आहे. 'आयबीएम' ने चीनमधील संशोधन आणि विकास कार्य थांबवले आहे. फेसबुकची मूळ कंपनी मेटा, गुगल, मेझॉन इत्यादी मोठ्या टेक कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर आपल्या कर्मचाऱ्यांना कामावरून काढले आहे. मेटा ने ११,००० गुगलने १२,०००, मेझॉनने १८,००० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले होते. याशिवाय डेलने ६,६५० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले होते. गेल्या काही वर्षांपासून देशात बेरोजगारी शिगेला पोहोचली आहे. परिस्थिती अशी आहे की सुशिक्षित बेरोजगारांची संख्या प्रचंड वाढत आहे. अनेक उच्चशिक्षित तरुणांना नोकरीच्या संधी मिळत नाहीत. देशातील प्रसिद्ध 'आयआयटी' मुंबईच्या ७५ टक्के विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटद्वारे नोकऱ्या मिळाल्या आहेत; मात्र २५ टक्के विद्यार्थी रोजगारापासून वंचित राहिल्याने आता या विद्यार्थ्यांना नोकरीसाठी बाहेर जावे लागणार आहे. 'आयआयटी' मुंबईच्या २०२४ च्या कॅम्पस प्लेसमेंटमध्ये असे दिसून आले आहे, की विद्यार्थ्यांच्या वार्षिक पॅकेजमध्ये ७.७ टक्क्यांनी वाढ झाली असली, तरी २५ टक्के विद्यार्थी बसलेले नाहीत. एवढेच नाही तर या वर्षी किमान वेतन पॅकेजही सहा लाखांवरून ४ लाख रुपये म्हणजेच ३३ हजार रुपये प्रति महिना झाले आहे. आश्चर्य म्हणजे हे पॅकेज १० विद्यार्थ्यांनी स्वीकारले आहे. आता 'आयआयटी'च्या विद्यार्थ्यांनाही इतक्या कमी पगारात काम करावे लागणार आहे. यावरून देशातील बेरोजगारीच्या स्थितीचा अंदाज येऊ शकतो. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालात असे दिसून आले आहे, की भारतातील एकूण बेरोजगारांपैकी ८० टक्के तरुण आहेत. 'द इंडिया एम्प्लॉयमेंट रिपोर्ट २०२४' नुसार, गेल्या २० वर्षांत भारतातील तरुणांमधील बेरोजगारी जवळपास ३० टक्क्यांनी वाढली आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना आणि मानव विकास संस्था) यांनी संयुक्तपणे हा अहवाल तयार केला आहे. हायस्कूल किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षण घेतलेल्या तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण खूप जास्त असल्याचे अहवालात म्हटले आहे.

महिला सर्वाधिक बेरोजगार आहेत. त्यात पदवीधर पदविकाधारकांमध्ये सर्वाधिक बेरोजगारी आढळून आली. जवळपास ९५ टक्के बेरोजगार महिला होत्या. भारतातील रोजगार मुख्यतः अनौपचारिक आहे किंवा लोक स्वतःचे काम करत आहेत. २००० पासून औपचारिक रोजगाराचे प्रमाण सातत्याने वाढत होते; परंतु २०१८ नंतर त्यात मोठी घट झाली आहे आणि करारावर आधारित नोकऱ्यांमध्ये वाढ झाली आहे. फार कमी लोक नियमित आणि दीर्घकालीन कंत्राटी नोकऱ्यांमध्ये आहेत. दीर्घकालीन करार मिळालेल्या नोकरदार लोकांचे हे प्रमाण फारच कमी आहे, असे अहवालात म्हटले आहे. २०१९ पासून कायमस्वरूपी नोकरी करणाऱ्यांचे उत्पन्न एकतर स्थिर राहिले आहे किंवा कमी झाले आहे ही चिंतेची बाब आहे. २०१२ ते २०२२ दरम्यान अनौपचारिक रोजगार करणाऱ्यांच्या उत्पन्नात काही प्रमाणात वाढ झाली आहे. ७५ टक्के तरुणांना ईमेलमध्ये असलेली कागदपत्रे पाठवताही येत नाहीत. ६० टक्के तरुणांना कॉम्प्युटरवर कॉपी-पेस्ट करण्यासारखी साधी कामेही करता येत नाहीत, तर ९० टक्के तरुणांना गणिताची सूत्रे स्प्रेडशीटवर कशी वापरायची हे माहीत नाही. भारतातील तरुणांची लोकसंख्या २०२१ मध्ये २७ टक्के होती, जी २०३६ पर्यंत २१ टक्के होईल. म्हणजेच दरवर्षी ७० ते ८० लाख तरुण नोकरी शोधणाऱ्यांच्या रांगेत सामिल होतील. या अहवालात नमूद करण्यात आले आहे की, बिगर कृषी रोजगार वाढवण्यासाठी धोरणांमध्ये बदल करण्याची गरज आहे तसे केले तरच येत्या काही वर्षांत बेरोजगारीच्या रेषा अधिक लांब होण्यापासून रोखता येतील.

# केंद्र सरकारने वक्फ दुरुस्ती विधेयक मागे घ्यावे

**मुंबई** : वक्फ संरक्षण आणि पारदर्शकता या गोंडस नावाखाली वक्फ च्या मालमत्ता पाडण्याचा आणि बळकावण्याचा प्रकार वक्फ विधेयकाच्या माध्यमातून होणार आहे. त्यामुळे लोकसभेत सादर करून नव्याने प्रस्तावित केलेले वक्फ दुरुस्ती विधेयक केंद्र सरकारने मागे घ्यावे.अशी मागणी मुंबई मराठी पत्रकार संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत जमात-ए-इस्लामी हिंद आणि प्रमुख मुस्लिम संघटनांनी केली.




प्रस्तावित विधेयकात वक्फची व्याख्या, मुतवल्लीचा दर्जा आणि वक्फ बोर्डाचे अधिकार यात सुधारणा करण्यात आल्या आहेत. या अंतर्गत केंद्रीय वक्फ परिषद आणि वक्फ बोर्डाच्या सदस्यांची संख्या वाढवण्याच्या नावाखाली बिगर मुस्लिमांना सक्तीचे सदस्य बनविण्याचा प्रस्ताव आहे. सेंट्रल वक्फ कौन्सिलमध्ये गैर-मुस्लिम सदस्यांची संख्या १३ पर्यंत असू शकते, त्यापैकी दोन सदस्य अनिवार्य असतील. तसेच वक्फ बोर्डात बिगर मुस्लिम सदस्यांची संख्या ७ पर्यंत असू शकते, त्यापैकी दोन सदस्य अनिवार्य असतील. हा प्रस्ताव संविधानाच्या अनुच्छेद २६ चे उल्लंघन करतो, असे हे विधेयक गोंधळाचे व संशयाचे हे विधेयक मागे घ्यावे असे महाराष्ट्र डेमोक्रेटिक फोरम मुंबई चे समव्यक शाकीर शेख सांगिले.

यावेळी ऍड हातिम यूसुफ मुछला अध्यक्ष एपीसीआर, डॉ जहीर काजी अध्यक्ष अंजुमन-ए- इस्लाम मुंबई, इकराम उल जब्बार सेवानिवृत्त आईआर एस पुणे, मौलाना निज़ामुद्दीन फखरुद्दीन पुणे, मौलाना फहीम फलाही सचिव अवकाफ सेल महाराष्ट्र, सरफराज आरजू संपादक दैनिक हिंदुस्तान,मौलाना अनीस अशरफी अध्यक्ष रझा फाउंडेशन मुंबई, मौलाना आगा रूह जफर इमाम शोध जमात मुंबई, शाकीर शेख समव्यक महाराष्ट्र डेमोक्रेटिक फोरम मुंबई आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# रिसोड पत्रकार संघाचे अध्यक्ष सतिश मांदळे यांचा सत्कार

**रिसोड** : .रिसोड पत्रकार संघाची नुक्तीच नविन कार्यकारणी मध्ये दैनिक देशोन्नतीचे झुंझार पत्रकार सतिश मांदळे यांची तालुका अध्यक्ष पदावर निवड झाल्या बद्दल ॲड.नकुलदादा देशमुख मित्रमंडळाच्या वतीने जंगी सत्कार करण्यात आला,

ॲड.नकुलदादा देशमुख मित्रमंडळातील ॲड.नकुलदादा देशमुख,जि.प.चे माजी उपाध्यक्ष गजाननराव लाटे,माजी नगराध्यक्ष यशवंत देशमुख, गजानन देशमुख यांच्या माध्यमातून तालुक्यातील विविध सामाजिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी पुढाकार घेतल्या जातो.माजी. खा.अनंतरावजी देशमुख यांच्या माध्यमातून तालुक्यातील उपक्रमशिल बाबींना सतत प्रोत्साहीत करण्या संदर्भात पुढाकार घेण्याची शिकवण त्यांच्या फळीतील कार्यकर्त्यांना लाभलेली आहे.त्या अनुशंगाने रिसोड पत्रकार संघाचे नवनिर्वाचीत अध्यक्ष सतिष मांदळे यांचा शाल श्रीफळ देत जंगी सत्कार करण्यात आला.यावेळी ॲड.नकुलदादा देशमुख मित्र मंडळातील अनेक सदस्य उपस्थित होते.



# दौंडमध्ये भाजपच्या अडचणी वाढत आहेत



**दौंड** : दौंड तालुक्यात भाजप आमदार यांच्या विरोधात बातम्या आल्या की, ते आपल्या निष्ठावंत कार्यकर्ते यांना हाताशी धरून बाजु सावरण्याचा केविलवाणा प्रयत्न करीत असल्याची दौंड तालुक्यात सर्व दुर चर्चा सुरु झाली आहे.

दौंड मद्धे भाजप विरोधी प्रचंड तीव्र नाराजी असुन हि नाराजी वेगानं तालुक्यात पसरत चालली आहे.

भाजप विरोधात नाराजी पसरण्यास राज्य स्तरावरील कारणे, भाजपची फसवी धोरणे यासह भाजप आमदार राहुल कुल यांच बाबत असलेली नाराजी कारणी भुतं आहे.

सन २०१४ मद्धे कुल सहज निवडुंण आले. मग २०१९ मद्धे राज्यात भाजप सत्तेवर असताना आणि तात्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राहुल कुल हे गळ्यातील ताईत, उजवे हात, विस्वासु मानण्यात येत होते, शिवाय कुल यांना मंत्री करु. असे वरवंड प्रचार सभेत फडणविस यानी आवाहन करुनही कुलांच मताधिक्य प्रचंड घसरून ते पडता पडता वाचले आहेत. हि वेळ कुल यांचेवर का आली. याबाबत कुल यांचे निष्ठावंत विचार करीत नाहित.हि कुल यांचे बाबत ग़भीर बाब आहे.

मग आत्ता आत्ता राहुल कुल याच़ी मतदान संख्या वाढेल, बाजु भक्कम झाली हि सर्व कुल निष्ठावंत याऩा दिवसा पडलेली स्वप्ने आहेत. त्यांचं तेही निष्ठा व्यक्त करण्या साठी ठिक असेल

परंतु २०१९ लाख कुल पडता पडता वाचले असले तरी यावेळी २९२४ निवडणुकीत कुल हे अत्यंत प्रचंड अडचणीत आले असुन वाचण्याची शक्यता नसल्याचे राजकिय जाणकार स्पष्टपणे व्यक्त करीत आहेत.या बाबत कुल यांचे विषयी वाढलेल्या नाराजीची गंभीर कारणे असुन ती कारणे निवडणुक जाहिर झाली की स्पष्ट पुढे येण्याची शक्यता आहे.आणी त्यावेळी मात्र अडचणी वाढलेल्या असतील.

सद्ध्या तरी दौंड मध्ये आमदार कुल यांच्या अडचणी भाजप जेष्ठ नेते आणि कुल यांचे कट्टर समर्थक तानाजी दिवेकर यांचे विरोधात विनयभंग गुन्हा दाखल होणे. आणि भिमाचया सेवावृत्त कामगार यांनी बैठक घेवुन कुल यांच्या पराभव करण्यासाठी निर्धार जाहीर करणे. हि दोन कारणे धोक्याची घंटा ठरणारी आहेत.



# कदम वस्ती शाळेत हेल्मेट वाटप

**देऊळगाव राजे** : राईट टू सेफ्टी उपक्रमांतर्गत कदम वस्तीवरील जिल्हा परिषदेच्या शाळेत नुकतेच हेल्मेट वाटप करण्यात आले. रिच ट्रस्ट व सेवा सहयोग फाउंडेशन यांच्यातर्फे शाळेतील ६६ विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना राईट टू सेफ्टी उपक्रमांतर्गत हेल्मेट चे वाटप करण्यात आले, रस्ते अपघात सुरक्षिततेसाठी हेल्मेट चे वाटप करण्यात आले, यावेळी हेल्मेट वापराचे महत्त्व व उपयोग विद्यार्थी व पालकांना समजावून सांगण्यात आला.

कार्यक्रमासाठी ट्रस्टच्या संचालिका नीलिमा पाटील, सेवा सहयोग फाउंडेशन चे मिलिंद सातभाई व त्यांची टीम सिद्धेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव हरिश्चंद्र ठोंबरे ,जालिंदर अवारी, आलेगावचे सरपंच नाथा कदम, अशोक कदम ,मच्छिंद्र कदम, प्रशांत कदम ,राहुल कदम ,सचिन इंगवले, अजित कदम ,अमोल काळे, गजानन कदम, केंजळे सर मुख्याध्यापक भोसले सर ,वाघमारे सर आदी मान्यवर उपस्थित होते.

ग्रामस्थ पालक यांनी दोन्ही संस्थेचे या सामाजिक उपक्रमाबद्दल ऋण व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खेडकर सर यांनी केले.

# खाजगी भांडवलदारांच्या ताब्यात वीज कंपन्या देऊ नका

**मुंबई** : कोणत्याही वीज कंपन्यांचे खाजगीकरण करणार नाही असे आश्वासन सरकारने दिले होते. मात्र आधुनिकरण व नुतनीकरण करण्याच्या नावाखाली खाजगी भांडवलदारांच्या ताब्यात वीज कंपन्या देण्याच्या सरकारच्या निर्णयास कृती समितीचा तीव्र विरोध आहे. त्यामुळे आता तीव्र आंदोलन व त्यानंतर संप करण्याचा इशारा कामगार संघटनांनी दिला आहे.



वीज कर्मचाऱ्यांना पेन्शन लागू करावी. निर्मिती, पारेषण व वितरण या तिन्ही कंपन्यातील कर्मचारी, अभियंते, अधिकारी हे चक्रीवादळ, महापुर, कोरोना काळात खाजगी भांडवलदारां सोबत स्पर्धा करत काम करत असताना आम्हालाच का आंदोलन करावे लागते. राज्यातील ३ कोटीच्यावर असलेल्या वीज ग्राहकांना जोखीम पत्करून अविरत वीज निर्मिती, पारेषण व वितरणाचे काम करत असताना हा अन्याय का ? असा सवाल कामगार नेते शांताराम भोयर यांनी केला आहे.

महापारेषण कंपनी ही आशिया खंडात पारेषणाच्या क्षेत्रामध्ये काम करणारी मोठी सार्वजनिक वीज कंपनी आहे. या कंपनीने राज्य सरकारच्या मदतीने अनेक मोठे मोठे प्रकल्प स्वयंबळावर निर्माण करून कार्यक्षमतेने चालविलेले आहे. सरकारने व महापारेषण कंपनीच्या व्यवस्थापनाने खाजगी उद्योजकांना उभारणीसाठी, चालवण्यासाठी व देखभाल-दुरूस्ती करीता देण्याचा निर्णय घेतलेला आहे तो चुकीचा आहे असे भोईर यांनी सांगितले.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# हडपसरमधील विठ्ठल तुपे पाटील नाट्यगृहास उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट

## अजित पवार , मनपा आयुक्त यांनी केली पहाणी नाट्यगृहाची पहाणी



**हडपसर :** हडपसरमध्ये विठ्ठल तुपे पाटील नाट्यगृहाचे लोकार्पण सोहळा शनिवारी करण्यात आला.जवळपास ४५ कोटी खर्च करून ८३८ आसन क्षमता असलेले अत्याधुनिक सोयीसुविधेने उभारण्यात आलेले महाराष्ट्र राज्यात कुठेच पहायला मिळणार नाही अशी भव्य देखणी वास्तु पुणे महापालिकेच्या माध्यमातून उभारण्यात आली . परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आलेला होता शनिवारी ७ सप्टेंबर रोजी उद्घाटन सोहळ्यास अजित पवार राहिले नसल्याने त्यावेळी लिलावती विठ्ठल तुपे , मनपा आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले, यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

अजित पवार लोकार्पण सोहळ्यास कांही कारणास्तव उपस्थित राहिले नसल्या मंगळवारी नाट्यगृहास भेट देऊन नाट्यगृहाची संपूर्ण पहाणी केली.

वास्तु बांधणा-या अर्किटेकची प्रशंसा करीत नाट्यगृह छान तयार करण्यात आले असल्याचे अजित पवार यांनी पहाणी करतेवेळी बोलत होते.

नाट्यगृह पहाणी करतेवेळी हडपसर विधानसभेचे आमदार चेतन तुपे पाटील, मनपा आयुक्त डॉ.राजेंद्र भोसले , शहर अभियंता प्रशांत वाघमारे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष सुरेश घुले,माजी महापौर वैशाली बनकर,हडपसर अध्यक्ष डॉ शंतनु जगदाळे,संदिप बधे, अमर तुपे, इशान तुपे, अजिनाथ भोईटे,वामन धाडवे, अरुण आल्हाट, सागरराजे भोसले,नाट्य कलाकार प्रशांत बोगम, आदी मान्यवर उपस्थित होते.

# डीसीएम सोसायटीत विशाल शेवाळे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा

पुणे : डीसीएम सोसायटी ऑफ इंडिया ससंस्थेचे जनरल सेक्रटरी व रिपाइं महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष विशाल शेवाळे यांचा वाढदिवस डीसीएम सोसायटीत विविध उपक्रमानी वाढदिवस साजरा करण्यात आला.

वाढदिवसानिमित्त डीसीएम सोसायटीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शालेय साहित्य वाटप करुन तसेच अन्नदान वाटप करण्यात आले.



वाढदिवसानिमित्त डीसीएम सोसायटीतील आयोजित कार्यक्रमास यावेळी माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे, माजी नगरसेवक अविनाश साळवे, रिपाइं पुणे शहर माजी शहर अध्यक्ष महेंद्र कांबळे, शैलेंद्र चव्हाण, संजय सोनवणे, संगिता आठवले,महापाल वाघमारे , शाम सदाफुले, डीसीएमचे खजिनदार सिध्दार्थ शेवाळे, मुख्याध्यापिका शिल्पाताई भोसले, वर्षा पाटील,यशोधन शेवाळे, सुश्मिता शेवाळे,प्राचार्य भारती सहस्त्रबुध्दे, उप प्राचार्य नरेश पोटे, किशोर भुजबळ,पंडित गोसावी ,अशोक नांगरे,सुमित श्रीवास्तव,प्रसिद्ध गायक प्रवीण येवले, भगवान गायकवाड, खंडू शिंदे, नरेश बनसोडे , दादाभाऊ वारभुवन , रमेश तेलावडे , संदीप धांडोरे,रोहित कांबळे, सुन्नाभी शेख,व संस्थेतील शिक्षक , कर्मचारी ,विद्यार्थी आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय सामाजिक न्याय विभाग राज्य मंत्री रामदास आठवले साहेब यांनी विशाल शेवाळे यांना सुचना केली की, आण्णाभाऊ साठे यांच्या सांगली जिल्ह्यातील वाटेगाव या गावी आण्णाभाऊ साठे यांच्या नावाने महाविद्यालय सुरु करण्यात यावे ,वाटेगावी भव्य असे महाविद्यालय उभारावे त्यासाठी आपण सर्व कांही मदत करु अशा सुचना आदेश विशाल शेवाळे यांना रामदास आठवले यांनी दिला.

वाढदिवसानिमित्त डीसीएम सोसायटीतील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण साहित्य व तसेच अन्नदान वाटप करण्यात आले.

# खतगावकरांच्या काँग्रेस प्रवेशावर शिक्कामोर्तब

**नांदेड :** जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते भास्करराव पाटील खतगावकर आणि त्यांच्या समर्थकांचे अखेर ठरले. भाजपाकडून सतत झालेल्या उपेक्षेबद्दल वेगवेगळ्या भागातील कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त करत खतगावकर यांनी पुन्हा स्वगृही जावे आणि काँग्रेस पक्षाला जिल्ह्यात उभारी द्यावी, अशी भावना व्यक्त केली. त्यानंतर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांकडून आलेला प्रस्ताव मान्य करण्याचा ठराव शंकरनगर येथील मेळाव्यात करण्यात आला.

भास्करराव खतगावकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास जि.प. चे माजी अध्यक्ष श्रीराम पाटील राजूरकर, बाळासाहेब पाटील कवळे, डॉ. मीनल पाटील खतगावकर, भीमराव जेठे, माधवराव सुगावकर, प्रताप पाटील जिगळेकर, गणपतराव धुपेकर, सरजीतसिंघ गिल, मसूद देसाई आळंदीकर, मंगल देशमुख, बी.पी.नरोड, राजू गंदीगुडे आदी व्यासपीठावर उपस्थित होते. प्रारंभी दिवंगत खासदार वसंत चव्हाण यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# चौरस आहार व व्यायाम हीच शताब्दी वर्षाची गुरुकिल्ली : साहेबराव पवार

## आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्रासाठी पाठपुरावा

**सातारा :** उमेदीच्या काळात कसून केलेला व्यायाम आणि त्याला चौरस आहाराची दिलेली जोड यामुळे आजही वयाच्या १०० या वर्षांमध्ये मी तंदुरुस्त आहे.या शताब्दी वर्षांमध्ये अनेक स्वप्न पूर्ण झाली. काही स्वप्न बाकी आहेत मात्र या जीवनामध्ये मी कृतकृत्य आहे. अशा प्रामाणिक भावना सातारा येथील तालीम संघ मैदानाचे प्रमुख मार्गदर्शक व महाराष्ट्र कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष साहेबराव पवार यांनी व्यक्त केल्या. यावेळी त्यांनी अनेक आठवणी पत्रकारांजवळ उलगडल्या.

साहेबराव पवार यांचे १५ सप्टेंबर रोजी शंभराव्या वर्षात पदार्पण होत आहे. यानिमित्ताने साहेबराव पवार मित्र समूहवतीने येथील तालीम संघ मैदानावर शुभेच्छा तसेच जीवनसंग्रहपट प्रदर्शन, स्नेहभोजन आणि विविध कार्यक्रमांचा शुभारंभ असे भव्य आयोजन त्यांचे चिरंजीव राष्ट्रवादीचे नेते दिपकराव पवार आणि सुधीर पवार यांनी केले आहे. यामध्ये येथील निवासस्थानी झालेल्या अनौपचारिक गप्पांमध्ये साहेबराव पवार यांनी आपल्या आठवणी उलगडल्या

ते म्हणाले, शरीराला मी कधी वाईट वळण लागू दिले नाही. आमच्या लहानपणी तंदुरुस्त माणसांचा सहवास असायचा.त्यातून व्यायामाचे वेड लागले तब्बल ४० वर्ष जोर बैठका व्यायाम तसेच चौरस आहार पैलवानाचा खुराक याचे सातत्य होते म्हणून आजही माझी तब्येत १०० व्या वर्षीही ठणठणीत आहे. आजच्या पैलवानांनी स्वप्नांच्या मागे धावताना शरीराची तंदुरुस्ती ठेवली पाहिजे तसेच पैलवानकी झाल्यानंतर आयुष्यात आर्थिक साक्षर राहणे, शिक्षण घेणे गरजेचे आहे. .

# प्रशांत पाटील यांची निवड

**निढळ,:** निढळ, ता. खटावचे सुपुत्र प्रशांत खुस्पे पाटील यांची राष्ट्रवादी काँगेस पार्टी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस (उद्योग) विभागपदी निवड झाली. तसे नियुक्ती पत्र त्यांना सुभाष मालपाणी (प्रदेश अध्यक्ष उद्योग विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) आणि सागर भोगावकर ( राज्य उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वैद्यकीय मदत कक्ष) यांनी दिले.

# मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण यशस्वी करणे सर्व यंत्रणांची जबाबदारी : डुडी

**दहिवडी :** मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेमुळे सुशिक्षीत बेरोजगारांना सहा महिन्यांसाठी रोजगार उपलब्ध होणार आहे. शासकीय विभागांबरोबर खासगी संस्थांमध्येही या योजनेंतर्गत मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. विविध यंत्रणांनी मनुष्यबळाची जास्तीत जास्त मागणी करुन योजना यशस्वी राबवावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत जिल्हाधिकारी डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला उपवनसंरक्षक आदिती भरद्वाज, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने, जिल्हा उपनिबंधक संजयकुमार सुद्रीक, जिल्हा कौशल्य विकास अधिकारी सुनिल पवार यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण ही महाराष्ट्र शासनाची अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असून खासगी क्षेत्रातील आस्थापना व उद्योगांमध्ये १० टक्के तर सेवा क्षेत्रातील आस्थापना व उद्योगांमध्ये २० टक्के पदे भरता येणार आहेत. जिल्हाधिकारी श्री. डुडी म्हणाले, जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांनी जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राकडे मनुष्य उपलब्धतेबाबत तातडीने मागणी करावी. जिल्ह्यात बँकांची संख्या जास्त आहे, यामध्ये मनुष्यबळाची मागणी करावी. शिक्षण विभागानेही जिल्ह्यातील महाविद्यालयांची मागणी घेऊन गरजेनुसार सुशिक्षीत बेरोजगारांना नियुक्त्या द्याव्यात.

# नोडल अधिकाऱ्यांनी निवडणूक विषयक कामकाज सुरु करावे: जिल्हाधिकारी

**सातारा :** आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेऊन सर्व नोडल अधिकाऱ्यांनी निवडणूक विषयक कामाला लागावे, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

आगामी विधानसभा निवडणूक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी श्री. डुडी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी भगवान कांबळे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, पोलीस उपअधीक्षक गृह अतुल सबनीस, सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार, नोडल अधिकारी उपस्थित होते.

लोकसभा निवडणूक सर्व यंत्रणांनी अत्यंत उत्कृष्टपणे पार पाडली. त्याच धर्तीवर येणारी विधानसभा निवडणूकही उत्कृष्टपणे पार पाडावी, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. डुडी म्हणाले, या निवडणुकीसाठी १८ ते १९ वयोगटातील मतदारांची नोंदणी वाढवावी. त्यासाठी महाविद्यालये, विविध मंडळे यांचा सहभाग घ्यावा. घरोघरी सर्व्हेमध्ये जे मतदार मृत झाल्याचे आढळले आहेत त्यांची नावे तातडीने वगळावीत. दूबार मतदारांच्या नावाची खातरजमा करुन आवश्यक कार्यवाही त्वरीत करावी. सर्व मतदार याद्यांचे पुनर्रिक्षण करावे. त्यासाठी बीएलओंच्या कार्यशाळा घ्यावात. ईपीक रेषो अपेक्षित ठेवावा. निवडणूक विषयक सर्व प्रकारच्या अर्जांच्या पेंडन्सीचा तात्काळ निपटारा करावा. डाटा भरताना मतदान केंद्रांची नावे, त्यांची ठिकाणे, अक्षांश रेखांश, छायाचित्रे अचूक राहतील याची काळजी घ्यावी.

ज्या मतदारांची मतदान केंद्रे बदलेली आहेत, अशांना बदलाबद्दल अवगत करावे. मत मोजणी केंद्रांसाठी पुरेशा जागेची पहाणी करुन निवड करावी. यामध्ये वाहन पार्कींग, पोस्टल बॅलेट मोजणी, ईव्हीएम मशीनसाठी पुरेशी जागा असेल याची खात्री करावी. मत मोजणीसाठी ठिकाण निवडताना निवडणूक निर्णय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग व पोलीस विभाग यांनी संयुक्त पहाणी करुन १७ सप्टेंबरपर्यंत आराखडा पाठवावा, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डुडी यांनी केल्या. निवडणूक विषयक कामकाज करणाऱ्या मनुष्यबळाला आवश्यक प्रशिक्षण द्यावे. आचार संहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे यासाठी त्यांच्यात जाणीव जागृती निर्माण करावी, असे सांगून जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी दळवळण व्यवस्थापन, ईव्हीएम व्यवस्थापन, मनुष्यबळ प्रशिक्षण, मतदार यादी, साधन सामुग्री आदी सर्व विषयांबाबत सूचना दिल्या.

# आज पाटण तालुक्यातील विविध विकास कामांचे भूमीपुजन

**सातारा :** पाटण मतदार संघातील विविध विकास कामांचे भूमीपुजन व विविध प्रकल्पांचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत २९ सप्टेंबर रोजी होणार आहे. या कामांचा प्रगतीचा आढावा पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी घेतला.



जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षम समीर शेख, अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता संतोष रोकडे आदी उपस्थित होते.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे राज्यातील पहिले प्रशिक्षण केंद्र वाटोळे या ठिकाणी उभारण्यात येणार आहे. या कामाचे भूमीपुजन तसेच तारळी प्रकल्पाच्या ५ उपसासिंचन योजना ५० मीटर उंचीपर्यंत मंजूर होत्या. त्या योजनाही पूर्ण क्षेमतेने कार्य करीत नव्हत्या. गेली ४ वर्ष प्रयत्न करुन पालकमंत्री देसाई यांनी या योजना १०० मीटर पर्यंत उचलून त्यातून सिंचन व्हावे यासाठी प्रयत्न केले आहेत व कामे पूर्ण करून घेतली आहेत. या योजनांमधून पाणी सोडण्याचा शुभारंभ देखील मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते होणार आहे . मोरणा-गुरेघर प्रकल्पामध्ये उजवा आणि डावा तिर कालावा प्रस्तावित होता. त्यावर बंदिस्त पाईपलाईन टाकण्याच्या कामाचा शुभारंभ, नाटोशी उपसासिंचन योजना अंतर्गत जे क्षेत्र ओलिताखाली येत नाही असे ६५० एकर क्षेत्र ओलीताखाली येणार आहे या कामाचे भूमीपूजन, लोकनेते बाळासाहेब देसाई बहुउद्देशीय कृषी प्रशिक्षण संकुल, काळोली येथील पहिल्या टप्प्यातील इमारतीचे काम पूर्ण झाले आहे याचे उद्घाटन, गेल्या १० वर्षापासून प्रलंबीत असलेले पाटण नगर पंचायतीची नळ पाणी पुरवठा योजनेसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २२ कोटींचा निधी मंजूर केला या कामाचे भूमिपुजन करण्यात येणार आहे. तसेच पाटण तालुक्यातील प्रथमच उभारण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार असल्याचेही देसाई यांनी बैठकीत सांगितले.

## ठोसेघर प्रकल्पग्रस्तांना न्याय द्या : सचिन मोहिते

# तर कृष्णा खोरे महामंडळाला टाळे ठोकू

**सातारा :** ठोसेघर स्थिथ जगमीन धरणाच्या कालव्या साठी संपादित जागेचा मोबदला १९९७ पासून प्रकल्प ग्रस्थना मिळालेला नाही. वारंवार शासनाकडे तक्रार करून देखील याची दाखल घेतली जात नाही,ठेकेदाराचे बिल मात्र अत्यंत तत्परतेने काढले जाते आणि शेतकरी ग्रामस्थ वाऱ्यावर सोडले जातात हीच वस्तू स्थिती आहे ,याचा पुन्हा एकदा प्रत्यय या प्रकरणामुळे समोर आला आहे. याची तक्रार ग्रामस्थांनी शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख सचिन मोहिते यांच्याकडे केल्यावर त्यांनी ग्रामस्थांना घेऊन तडक सिंचन भवनमध्ये जाऊन अधीक्षक अभियंता एस. के. नाईक यांची भेट घेतली. या प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा अन्यथा कृष्णा खोरे महामंडळ कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा देण्यात आला आहे.

अधीक्षक अभियंता प्रकरण समजून घेऊन त्यांनी तत्काळ या बाबत दाखल घेऊन योग्य कार्यवाहीचे आदेश कार्यकारी अभियंता व उपअभियंता यांना दिले. याबाबत प्रतिक्रिया देताना सचिन मोहिते म्हणाले, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे स्वतः भूमीपुत्र असून प्रकल्पग्रस्त आहेत.पालकमंत्री शंभूराज देसाई हे प्रकल्पग्रस्तांच्या समस्येशी चांगलेच परिचित आहेत. गेल्या सत्तर वर्षात अजूनही प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सुटल्या नाही. हे प्रश्न राज्य सरकारने संवेदनशीलपणे सोडवायला हवेत अशी मागणी त्यांनी केली. ठोसेघर ग्रामस्थांनी या पाठपुराव्या बद्दल समाधान व्यक्त केले.

# प्रशासनाला येसूबाईंच्या स्फूर्ती स्थळासाठी एक महिन्याचा अल्टिमेटम

## सुहास राजेशिर्के यांची प्रशासनाशी चर्चा

**सातारा :** मौजे शृंगारपूर येथील सर्वे नंबर १४२/१२ या जागेवर महाराणी येसूबाई यांचे स्फूर्ती स्थळाचा विस्तार करून त्याला स्मारकाचा दर्जा देण्यात यावा. जिल्हा प्रशासन पातळीवर हा प्रश्न प्रलंबित आहे. हा प्रश्न तातडीने सोडवला जावा. याकरिता येसूबाई फाउंडेशनच्यावतीने रत्नागिरी जिल्हा प्रशासनाला एक महिन्याची मुदत देण्यात येत आहे, अन्यथा एक महिन्यानंतर पुन्हा लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा येसूबाई फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व साताऱ्याचे माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के यांनी दिला आहे हा इशारा देऊन त्यांनी आपले उपोषण मागे घेतले आहे सुहास राजेश शिर्के यांच्या आंदोलनाची दखल रत्नागिरी जिल्हा प्रशासनाने घेतली असून प्रशासनाच्यावतीने रत्नागिरीचे प्रांत जीवन देसाई यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा केली. या उपोषणामध्ये शृंगारपूरचे सरपंच विनोद भिकाजी पवार हे सहभागी झाले होते.

यासंदर्भात प्रशासनाला जे निवेदन देण्यात आले आहे या निवेदनात नमूद आहे की, शृंगारपूर येथील ग्रामपंचायत मालकीच्या जागेमध्ये स्फूर्ती स्थळ असून जिल्हाधिकारी कार्यालय पातळीवर काही महत्त्वाच्या परवानगी प्रलंबित आहे. या प्रस्तावावर जिल्हाधिकाऱ्यांनी शेरा दिलेला आहे. या मागणीची दखल घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाने यासंदर्भात कार्यवाही सुरू केल्याने माजी उपनगराध्यक्ष सुहास राजेशिर्के व शृंगारपूरचे सरपंच विनोद पवार यांनी हे उपोषण मागे घेतले आहे.या उपोषणामुळे दोघांनाही रक्तदाबाचा त्रास सुरू झाल्याने त्यांच्यावर स्थानिक इस्पितळात उपचार करण्यात येत आहे.




नियोजित महाराणी येसूबाई यांचे स्फूर्ती स्थळ विकसित करणे संदर्भात जिल्हाधिकारी रत्नागिरी यांनी तातडीने लक्ष घालावे. येथील जमीन मिळकत फेरफार क्रमांक १५३८ यामध्ये जिल्हा प्रशासन कार्यालयाचे अधिकार असले बाबत नमूद आहे याकरता जिल्हा नियोजन समितीतून या स्फूर्ती स्थळाच्या विकसनाबाबत जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून देण्यात यावा व त्याची देखभाल करण्याची जबाबदारी ग्रामपंचायत शृंगारपूर कार्यालयाच्या अंतर्गत देण्यात यावी या संदर्भातील कागदोपत्री कार्यवाही पूर्ण करण्यात आलेली आहे.प्रांत जीवन देसाई यांच्याकडे हे पत्र सुपूर्द करण्यात आले आहे. आंदोलनकर्ते व प्रशासन यांच्यात या विषयावर सकारात्मक चर्चा झाली आहे. जिल्हा प्रशासनाने तातडीने कार्यवाही करून या प्रश्नात गांभीर्याने लक्ष घालावे अन्यथा एक महिन्यानंतर पुन्हा याबाबतचे तीव्र आंदोलन लोकशाही मार्गाने करण्यात येईल असा इशारा सुहास राजेशिर्के यांनी दिला आहे.

# कोल्हापूर जिल्ह्यातील कोविड घोटाळ्याच्या तपासाची माहिती द्या

## उच्च न्यायालयाचे जिल्हा पोलिसप्रमुखांना आदेश

**कोल्हापूर :** जिल्ह्यात कोरोना काळात झालेल्या भ्रष्टाचाराच्या तक्रारीचा काय तपास केला याची माहिती १ ऑक्टोबर २०२४ पर्यंत द्या असे आदेश उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या पुढाकाराने झालेल्या या काळातील खरेदीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. या सर्व प्रकरणांमध्ये अनेक राजकीय नेत्यांचीही भूमिका संशयास्पद राहिल्याने वरील तारखेला होणाऱ्या पुढच्या सुनावणीकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.



कोरोना काळात विविध वैद्यकीय उपकरणे, औषधे खरेदी करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समिती कार्यरत होती. परंतु, तत्कालीन जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी खरेदीचे संपूर्ण अधिकार हे जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल यांना दिले. त्यानंतर सुमारे १५० कोटींहून अधिक रुपयांची खरेदी झाली. यामध्ये ३५ कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची तक्रार २५ फेब्रुवारी २०२२ रोजी विश्वजित जाधव, गौरव पाटील, जितेंद्र यादव (रा. कोल्हापूर) या तिघांनी शाहूपुरी पोलिस ठाण्यात दिली होती. यामध्ये अमन मित्तल, तत्कालीन जिल्हा लेखा व्यवस्थापक नितीन लोहार, औषध निर्माण अधिकारी युवराज बिल्ले यांची नावेही घालण्यात आली होती. तक्रार अर्ज न घेतल्याने त्यांनी २१ मार्च २०२२ रोजी तत्कालीन जिल्हा पोलिसप्रमुख शैलेश बलकवडे यांच्याकडे तक्रार करण्यात आली होती.

दरम्यान, या तिघांनी याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर ९ सप्टेंबरला सुनावणी झाली असून, आतापर्यंत या प्रकरणाचा काय तपास झाला आणि त्याची सद्य:स्थिती काय आहे याची माहिती पुढच्या सुनावणीवेळी द्यावी, असे आदेश न्यायमूर्तींनी दिले आहेत. १ ऑक्टोबर २४ रोजी ही सुनावणी होणार आहे. याचिकाकर्त्यांच्यावतीने ड जे. जे. बारदेस्कर यांनी काम पाहिले.

### हे आहेत आक्षेप

**आपत्कालीन परिस्थितीतील कलमे लावून निविदा न काढता वस्तूंची खरेदी, त्यांच्या नोंदी न सापडणे, तीन अधिकाऱ्यांच्या सहीने कंपन्यांना रक्कम अदा करणे आवश्यक असताना धनादेशावर दोनच अधिकाऱ्यांच्या सह्या, अनेक वस्तू पोहोच झाल्याच्या नोंदी नसणे असे अनेक आक्षेप याचिकाकर्त्यांनी घेतले आहेत. बेड, ऑक्सिमीटर, व्हेन्टिलेटर, पल्स मॉनिटर, टेम्परेचर गन, सलाईन स्टँड, एक्स रे मशिन्स यामध्ये हा गैरप्रकार झाल्याची ही तक्रार करण्यात आली होती.**

# विधानसभेच्या उमेदवारीवरुन जत तालुका भाजपात अस्वस्थता

**जत :** भाजपाकडून जत विधानसभेसाठी पाच-सहा उमेदवार इच्छुक आहेत. त्यामुळे उमेदवारीसाठी रस्सीखेच सुरू आहे. आता उमेदवारी मिळविण्यात कोण बाजी मारणार, अशा चर्चा रंगत असताना विधान परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर देखील जत मतदारसंघातून निवडणूक लढविण्यास तयारीत असल्याने जत तालुक्यातील भाजपात अस्वस्थता निर्माण झाली आहे.




जत विधासभेसाठी भाजपाकडून माजी आमदार विलासराव जगताप, जिल्हा बँकेचे संचालक प्रकाश जमदाडे, तम्मनगौडा रवी-पाटील, डॉ. रवींद्र आरळी आदी इच्छुक आहेत. विधानसभेसाठी प्रकाश जमदाडे व तम्मनगौडा रवी यांचे काम जोमात सुरू आहे. दोघेही उमेदवार आपापल्या परीने जनतेच्या कामांसंदर्भात जत तालुक्याचा दौरा करीत आहेत. रवी-पाटील यांनी तीन टप्प्यात जनकल्याण पदयात्रा काढली.

जमदाडेही जिल्हा बँकेच्या माध्यमातून प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक कार्यक्रमाला हजेरी लावत आहेत. त्यामुळे या दोघांपैकी कोण उमेदवारी पटकावतो, याबाबत उत्सुकता आहे. त्यातच गेल्या काही दिवसांपासून विधान परिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांनीही जतच्या उमेदवारीसाठी ताकद लावली आहे. यामुळे इच्छुक उमेदवारांसह स्थानिक नेतेमंडळींमध्ये अस्थस्थता आहे.

जत विधानसभेसाठी पडळकरांच्या उमेदवारीस अप्रत्यक्ष विरोध करण्यात येत आहे. जत तालुक्यातील प्रश्नांची जाण असलेला स्थानिक उमेदवारच भाजपने द्यावा, केवळ आमदारकीसाठी लुडबूड करणाऱ्यांना पक्षाचे कार्यकर्ते सहकार्य करणार नाहीत, अशी भूमिका भाजप व शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची आहे.

लोकसभा निवडणुकीनंतर विधानसभा निवडणुकीच्या हालचाली गतिमान झाल्या आहेत. विधानसभा निवडणूक नजरेसमोर ठेवून गोपीचंद पडळकर यांनी १ जूनपासून जत तालुक्याचा दौरा केला. दुसरीकडे माजी आमदार विलासराव जगताप यांनीही पडळकर यांच्या उमेदवारीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. 'वरून लादलेले नेतृत्व जनता स्वीकारणार नाही, उपरा उमेदवारही जतची स्वाभिमानी जनता सहन करणार नाही', असा इशारा ते प्रत्येक सभेत देत आहेत.

लोकसभेला संजय पाटील यांना विरोध करीत जगताप यांनी विशाल पाटील यांचा प्रचार केला. ते निवडूनही आले. आता जत विधानसभा निवडणूक जगताप हे स्वत: लढविणार की जत तालुक्यातील स्थानिक उमेदवारास पाठिंबा देणार?, याबाबतही चर्चेचे फड रंगत आहेत.

# कोल्हापूर विमानतळासाठी ६४ एकर जमिनीचे ऑक्टोबरपर्यंत संपादन

**कोल्हापूर :** कोल्हापूर विमानतळासाठी ६४ एकर जमीन ऑक्टोबरपर्यंत संपादित केली जाणार आहे, असे विमानतळाचे संचालक अनिल शिंदे यांनी स्पष्ट केले. कोल्हापूर विमानतळ सल्लागार समितीची यावर्षीची पहिली बैठक आज कोल्हापूर विमानतळ ठिकाणी समितीचे अध्यक्ष खासदार शाहू महाराज यांच्या अध्यक्षतेखाली झाली. विमानतळाचे विस्तारीकरण, नवीन विमान सेवेबाबत या बैठकीत निर्णय घेण्यात आले. जिल्हाधिकारी अमोल येडगे, आ. सतेज पाटील उपस्थित होते.

कोल्हापूर विमानतळावरील धावपट्टी विस्तारीकरणाचे काम लवकर पूर्ण करून नवीन हवाई मार्गावर विमानसेवा सुरू करण्यासाठी नियोजन करावे, अशी सूचना शाहू महाराज यांनी केली. विमान प्रवाशांकडून रिक्षाचालक मोठ्या प्रमाणात



भाड्याची दर आकारणी करतात, असा मुद्दा उपस्थित करून खासदार धैर्यशील माने यांनी विमानतळ प्रशासनाने हा प्रकार नियंत्रित करण्याची सूचना केली. आमदार ऋतुराज पाटील यांनी विमानतळ विस्तारीकरणांतर्गत भूसंपादन पुनर्वसनाचे तातडीने नियोजन करण्याची गरज व्यक्त केली. सल्लागार समितीचे तेज घाटगे यांनी पुढाकार घेऊन विमानतळ मार्गावर एक खासगी बस देण्यासाठी पुढाकार घेतला.

# सांगली महापालिकेच्या वार्षिक अनुदानात ६६ कोटींची घट

## लाडकी बहीणमुळे अनुदानाला कात्री

**सांगली :** शासनाने लाडकी बहीण योजना लागू केल्यानंतर महापालिकेला देण्यात येत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिपूर्ती अनुदान आणि पंधराव्या वित्त आयोगातील अनुदानाला कात्री लावली आहे. यामुळे महापालिकेला वार्षिक ६६ कोटींच्या अनुदानात घट झाली असून याचा विकासकामावर परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



शासनाने एलबीटी म्हणजेच स्थानिक संस्था कर हटविल्यानंतर या बदल्यात महापालिकेला अनुदान दिले जाते. यानुसार सांगली महापालिकेला शासनाकडून मिळणाऱ्या एलबीटी अनुदानात २० टक्के कपात केली आहे. यामुळे मासिक ३ कोटींच्या अनुदानाला मुकावे लागणार आहे.

तसेच या महिन्यापासून चौदाव्या वित्त आयोगानुसार मिळणाऱ्या अनुदानातही सुमारे ६० टक्के कपात करण्यात आली असून यामुळे वार्षिक ३० कोटींचे अनुदान रोखले जाणार आहे. एलबीटी प्रतिपूर्ती अनुदानात २० आणि वित्त आयोगाच्या अनुदानात ६० टक्के शासनाने कपात केल्याने महापालिकेला मिळू शकणारे सुमारे ६६ कोटींचे अनुदान थांबणार आहे. या अनुदानातून महापालिका कर्मचाऱ्यांचे वेतन वेळच्यावेळी होत होते. आता वेतनासाठी अन्य पर्याय शोधावे लागणार आहेत. तसेच विकासकामासाठी निधीची चणचण भासणार असल्याचे महापालिकेतील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न देण्याच्या अटीवर सांगितले.

## 'नारीशक्ती दूत' ॲप बंद

### लाडकी बहीणचे अर्ज अंगणवाडीसेविका भरणार



**सांगली :** राज्य शासनाने महिलांसाठी सुरू केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा मोठा गाजावाजा केला असला, तरी सध्या या अर्ज भरण्याचे प आणि पोर्टल चालत नसल्यामुळे या योजनेसाठी अर्ज भरणाऱ्या महिलांमधून सरकारच्या कारभाराबद्दल संताप व्यक्त होऊ लागला. लाडकी बहीण योजनेसाठी ३० सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याची मुदत असून, अंगणवाडीसेविका अर्ज भरणार आहेत. दरम्यान, अंगणवाडी सेविकांना प्रशासनाकडून सूचना नसल्यामुळे त्याही अर्ज भरून घेत नाहीत.

दोन महिन्यांपूर्वी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जाहीर करण्यात आली, यासाठी महिलांना प्रतिमाह दीड हजार रुपये देण्याची घोषणा केली. यासाठी सरकारने निश्चित केलेल्या अटींमध्ये वारंवार बदल केला आहे. जिल्ह्यातील सात लाख २० हजार महिलांनी अर्ज भरले आहेत. त्यापैकी सात लाख महिलांच्या अर्जाला मंजुरी दिली आहे. शासनाने नव्याने विकसित केलेले नारीशक्ती दूत हे प चालत नाही. लाडकी बहीण पोर्टलही गेल्या काही दिवसांपासून बंद आहे. त्यामुळे अर्ज भरणाऱ्या महिला त्रस्त आहेत.



# पूल ३२ कोटींचा आणि सुशोभीकरणावर २० कोटी

**पिंपरी :** महापालिकेच्या वतीने सांगवी-बोपोडी असा मुळा नदीवर पूल बांधण्यात येत आहे. पुलाचे काम अंतिम टप्प्यात असून, त्यासाठी ३२ कोटी ३६ लाखांचा खर्च करण्यात आला आहे. आता पुलाच्या सुशोभीकरणावर आणखी २० कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या सूचनेनुसार हे सुशोभीकरण करण्यात येणार असल्याचा दावा महापालिका अधिकाऱ्यांनी केला आहे.

या पुलासाठी ३२ कोटी ३६ लाखांचा खर्च करण्यात आला आहे. हे काम टी अँड टी इन्फ्रा लिमिटेड कंपनी करत आहे. कामाची मुदत दोन वर्षे होती. मात्र, पुण्याकडील राष्ट्रीय कृषी संशोधन केंद्राची जागा मिळण्यास विलंब झाल्याने ठेकेदाराला ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. सप्टेंबर महिन्याचे पंधरा दिवस झाले तरी अद्याप पुलाचे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे रहदारी सुरू करण्यात आली नाही. असे असताना पुलाच्या सुशोभीकरणासाठी नव्याने निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे. केवळ सुशोभीकरणावर १९ कोटी ६३ लाख रुपये खर्च करण्यात येणार आहेत. या खर्चास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मान्यता दिली.

पिंपरी-चिंचवड आणि पुणे शहराला जोडणारा हा पूल आहे. त्यामुळे पुलाचे उत्तमरीत्या सुशोभीकरण करण्यासाठी माजी महापौर आणि माजी नगरसेवकांनी महापालिकेकडे पाठपुरावा केला आहे. त्यानुसार पुलाचे संकल्पचित्र व प्राथमिक आराखडा बनविण्यात आला. त्याबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर २५ ऑगस्टला सादरीकरण करण्यात आले. त्यांनी सुचविलेले बदल समाविष्ट करून आराखडा तयार करण्यात आला. त्यानुसार पुलाचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे.

### पुलाकडे जाणारे रस्ते अरुंद

या नवीन पुलाकडे जाणारे सांगवीतील सर्व रस्ते अरुंद आहेत. पुलाकडे जाण्यासाठी सांगवीतील ममतानगर, दत्त आश्रम मठ, प्रियदर्शनीनगर, पवनानगर, मुळानगर हे रस्ते आहेत. ते सर्व अरुंद आहेत. पुणे शहराकडून ये-जा करणारी वाहतूक रहदारी मोठी असणार आहे. त्यामुळे अंतर्गत अरुंद रस्त्यांवर वाहतूककोंडीची समस्या निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# बाप्पा गेले आपल्या गावाला; घरगुती श्रीगणेशाला निरोप

## कोल्हापूर शहरात २०७ कृत्रिम विसर्जन कुंड

**कोल्हापूर :** आपल्या आगमनाने, चैतन्यदायी अस्तित्वाने, वरदहस्ताने भक्तांमध्ये दुर्दम्य उत्साह, सुख, समृद्धी आणि आनंद आणलेल्या लाडक्या गणपती बाप्पांना, गौराईला निरोप द्यायचा क्षण काल गुरुवारी आला होता. गेल्या पाच दिवसांपासून घराघरातील अबालवृद्धांना आपल्या भक्तीत तल्लीन करून अवघा रंग एक करणाऱ्या देवाला निरोप देताना समस्त कोल्हापूरकरांची मने जड झाली होती. येऊ नये असे वाटते, तो निरोपाचा दिवस काल आला होता. या निमित्त शहरात कोल्हापूर महापालिका, तसेच जिल्ह्यामध्ये प्रशासनाच्या वतीने पर्यावरणपूरक विसर्जनाची तयारी पूर्ण केली होती.

एक वर्ष वाट पाहिल्यानंतर केवळ पाच दिवसांचा पाहुणा म्हणून आलेले गणराय घरी असतात, तो काळ भरलेला असतो. भक्तिमय आणि प्रसन्न असतो. हे मंगलमयी वातावरण, हे सुख कधी संपूच नये, असे प्रत्येकाला वाटते, पण शेवटी तो क्षण येतोच, जेव्हा लाडक्या गणरायाला निरोप द्यावा लागतो. काल गुरुवारी गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या, अशी आळवणी करत कोल्हापूरकर गणपती बाप्पांना निरोप देत होते.



राज्यासाठी आदर्शवत असलेल्या पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाचा वारसा यंदाही जपत कोल्हापूरकर काहिलींमध्ये श्रीगणेशमूर्तींचे विसर्जन केले आहेत. त्यासाठी महापालिकेच्या वतीने शहरातील चौकाचौकात काहिलींची व्यवस्था करण्यात आली होती. यासह भागाभागातील तरुण मंडळे, गणेश मंडळे, स्वयंसेवी संस्थांनीही पुढाकार घेऊन विसर्जनाची तयारी केली होती. विसर्जित गणेशमूर्तींचे इराणी खणीत पुन्हा विसर्जन केले जाणार आहे. भागाभागातून गणेशमूर्ती नेण्यासाठी ट्रॉलींची सोय केली होती. कोल्हापूर शहरासह इचलकरंजी महापालिका, जिल्हा परिषद, नगरपालिका, गावागावांमध्येही पर्यावरणपूरक विसर्जनाची तयारी पूर्ण झाली होती.

शहरातील पंचगंगा नदी घाट, रंकाळा, कोटीतीर्थ, कळंबा तलाव यासह जलाशयांच्या ठिकाणी गणेशमूर्ती विसर्जित करण्यासाठी कुंडांची सोय केली होती. स्वयंसेवक व कार्यकर्ते भाविकांना गणेशमूर्ती विसर्जनासाठी मदत केली. यासह शंभर टक्के निर्माल्य संकलित केले.

घरगुती गौरी गणपती विसर्जनासाठी महानगरपालिका प्रशासनाने शहरात सर्वत्र २०७ कृत्रिम विसर्जन कुंड तयार केले होते. याशिवाय स्वयंसेवी संस्था, मंडळाच्या कार्यकर्त्यांनीही विसर्जनाची व्यवस्था केली होते. विसर्जन प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी बारकाईने नियोजन करण्यात आले होते. सर्व यंत्रणा सज्ज झाली होती. घरगुती गणपती विसर्जनाच्या तयारीचा प्रशासक के. मंजूलक्ष्मी यांनी बुधवारी आढावा होता.

# मिरजेत उमेदवारीसाठी इच्छुकांचे गुडघ्याला बाशिंग

**म्हैसाळ, दि. १२ वृत्तसंस्था :** मिरज विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीकडून निवडणुकीच्या रणांगणात उतरण्यासाठी अनेक जण गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत, परंतु कोणाला उमेदवारी मिळणार? कोणाचा पत्ता कट होणार, याची चर्चामहाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांत रंगली आहे.

मिरज विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व गेली तीन टर्म राज्याचे कामगार मंत्री व पालकमंत्री सुरेश खाडे हे करीत आहेत. येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत कोणत्याही परिस्थितीत महाविकास आघाडीचाच आमदार निवडून आणायचा, असा चंग महाविकास आघाडीच्या वरिष्ठ नेतेमंडळींनी बांधला आहे. त्यामुळे वरिष्ठ नेत्यांची स्वप्ने सत्यात उतरविण्यासाठी महाविकास आघाडीतील अनेक इच्छुक उमेदवार गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत.

महाविकास आघाडीकडून इच्छुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बाळासाहेब होनमोरे, राजीव आवळे, प्रमोद इनामदार, अर्जुन कांबळे, उत्तम कांबळे हे इच्छुक आहेत, तर काँग्रेसकडून उद्योगपती सी. आर. सांगलीकर, उद्धवसेनेकडून सिद्धार्थ जाधव, तानाजी सातपुते ही सध्या चर्चेत असणारी नावे आहेत.

मिरज विधानसभा मतदारसंघात महायुती व महाविकास आघाडी अशीच लढत होणार, हे नक्की आहे. त्यामुळे महाविकास आघाडीत सध्या एकूण आठ चेहरे आहेत. यापैकी फक्त एकालाच उमेदवारी मिळणार आहे. दुसऱ्या बाजूला हा मतदारसंघ कोणत्या पक्षाला सोडायचा हे ठरलेले नाही. त्यामुळे कोणत्या पक्षाला मतदारसंघ मिळणार? याची उत्तरे अनुत्तरित असली, तरी महाविकास आघाडीतील घटक पक्ष असणाऱ्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, उद्धवसेना यांनी मात्र हा मतदारसंघ महाविकास आघाडीकडे खेचण्याचे ठरविले असल्याचे दिसते. प्रत्येक इच्छुक उमेदवार हे मतदारसंघात फिरताना कार्यकर्त्यांना आत्मविश्वासाने सांगत आहेत की, यंदा मलाच उमेदवारी मिळणार. येत्या काळात मीच मिरजेचा आमदार होणार. त्यामळे महाविकास आघाडीतील काम करणाऱ्या पदाधिकाऱ्यांत संभ्रमावस्था आहे.



### दोन नेत्यांची भूमिका महत्त्वाची !

**मिरज विधानसभा मतदारसंघात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या दोन्ही पक्षांची ताकद मोठी आहे. त्यामुळे मिरज विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचा उमेदवार ठरविताना काँग्रेसचे विशाल पाटील व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे मनोज शिंदे-म्हैसाळकर यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.**

### नेमकी उमेदवारी कोणाला

**महाविकास आघाडीकडून अनेक जण इच्छुक आहेत. ते सर्व मतदारसंघात दौरा करत आहेत. त्या सर्वांना वेगवेगळ्या कार्यक्रमाला बोलाविले जाते. तिथे त्यांचा आदरातिथ्य करताना भावी आमदार असा उल्लेख केला जातो. अशा कार्यक्रमांत आम्ही मात्र प्रत्येकालाच भावी आमदार म्हणत बसलोय, नेमकी उमेदवारी कोणाला मिळणार व आमदार कोण होणार? अशी चर्चा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये रंगली आहे.**